महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

✻ उत्सुकता ✻




RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २६९ ■ शनिवार दि. १६ मे २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

## राज्यात आजपासून सरकारी कांदा खरेदी सुरू; शेतकऱ्यांना दिलासा मिळणार का?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद :- राज्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव अक्षरशः कोसळल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक ठिकाणी कांद्याला प्रतिकिलो ५० पैसे ते २ रुपये इतकाच दर मिळत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज शुक्रवार (दि.१५ मे) पासून महाराष्ट्रात प्रतिकिलो १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्राच्या किंमत स्थिरीकरण निधीअंतर्गत ही खरेदी केली जाणार असून, यासाठी नाफेड आणि एन-सीसीएफ या दोन केंद्रीय संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. यंदा राज्यातून तब्बल २ लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी प्रत्येकी १ लाख टन कांदा नाफेड व एनसीसीएफ खरेदी करणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, कांदा खरेदीसाठी राज्यातील विविध बाजार समित्यांजवळ साठवणूक केंद्रांची तयारी करण्यात आली आहे. कांद्याची गुणवत्ता तपासल्यानंतर 'ग्रेड-ए' दर्जाचा कांदा स्वीकारला जाणार आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या बँक खात्यात खरेदीची रक्कम तीन दिवसांत जमा करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत नाशिकसह राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव घसरल्याने शेतकरी संतप्त झाला आहे. काही शेतकऱ्यांना तर विक्री खर्च वजा जाता हातात काहीच रक्कम उरत नसल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सामाजिक माध्यमांवरही याबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. कांदा उत्पादक संघटनांनी मात्र केवळ खरेदी जाहीर करून उपयोग नसून प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर आणि तातडीने खरेदी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे.

## कळवणमध्ये लग्नाचे वऱ्हाड अडवून तुंबळ हाणामारी; नाचण्याच्या वादातून महिलेसह तिघे गंभीर जखमी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक बागुल, कळवण (प्रतिनिधी): कळवण तालुक्यातील कळवण खुर्द येथे लग्नाचा आनंद साजरा करून परतणाऱ्या वऱ्हाडावर दबा धरून बसलेल्या टोळक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जुन्या वादाचे रूपांतर तुंबळ हाणामारीत झाले असून, या हल्ल्यात एका महिलेसह तीन युवक गंभीर जखमी झाले आहेत. भरदिवसा घडलेल्या या राड्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून आरोपींविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

नेमकी घटना काय? - मिळालेल्या माहितीनुसार, गोसराणे (ता. कळवण) येथील विशाल विजय बर्डे हे आपल्या कुटुंबीयांसह भूषण सुभाष मोरे यांच्या विवाह सोहळ्यासाठी कळवण खुर्द येथे गेले होते. गुरुवारी (दि. १४ मे) दुपारी विवाह सोहळा उत्साहात पार पडला. जेवण आटोपून सर्व वऱ्हाडी पिकअप वाहनाने आनंदाने आपल्या गावाकडे निघाले होते. मात्र, वाटेतच त्यांच्यावर काळाने घाला घातला. रस्त्यात गाड्या आडव्या लावून घातला धुमाकूळ - दुपारी चार वाजेच्या सुमारास वऱ्हाडाचे वाहन कळवण खुर्द ते कोल्हापूर फाटा मार्गावर आले असता, मानूर (ता. कळवण) येथील काही युवकांनी आपल्या मोटारसायकली रस्त्याच्या मधोमध आडव्या लावून वऱ्हाडाची गाडी अडवली. काही समजण्यापूर्वीच आरोपींनी १ मे रोजी गोसराणे येथे झालेल्या एका लग्नात 'नाचण्याच्या' कारणावरून जुना वाद उकरून काढला आणि शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. महिलेसह तिघे रक्ताच्या थारोळ्यात वादाचे रूपांतर काही वेळातच हाणामारीत झाले. अजय गांगुर्डे, उमेश पवार, राजेश माळी, गणेश पवार, जयेश माळी आणि शनि वाल्मीक (सर्व रा. आदिवासी वस्ती, मानूर) या सहा जणांनी वऱ्हाडातील मंडळींवर हल्ला चढवला. लाथाबुक्क्यांनी आणि हाताने केलेल्या या अमानुष मारहाणीत एका महिलेला गंभीर दुखापत झाली आहे. जखमी महिलेवर अभोणा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. तसेच तीन अन्य युवकही या हल्ल्यात जखमी झाले आहेत. गावाकडून संताप, पोलिसांत गुन्हा दाखल - या घटनेची माहिती गोसराणे गावात समजताच ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपींना तात्काळ बेड्या ठोकून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी गावकऱ्यांनी लावून धरली आहे.

पोलीस तपासाचा वेग: याप्रकरणी विशाल बर्डे यांच्या फिर्यादीवरून कळवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळवण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक खगेन्द्र टेंभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शेवाळे पुढील तपास करत असून आरोपींच्या अटकेसाठी हालचाली गतिमान झाल्या आहेत.

## राष्ट्रीय लोकअदालतीत ३ हजार ७६२ प्रकरणे निकाली; ६४ कोटी रूपयांचे तडजोड शुल्क वसूल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि. १५ मे २०२६ (जिमाका वृत्तसेवा): जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांच्यामार्फत जिल्ह्यात ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राहुल रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोकअदालतीत जिल्ह्यातून एकूण ३ हजार ७६२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून सर्व प्रकरणांमध्ये तडजोडीअंती सुमारे ६४ कोटी ९ लाख ४१ हजार ८४७ रूपये तडजोड शुक्ल म्हणून वसूल करण्यात आले, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश



वरिष्ठ स्तर तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सतीश हिवाळे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. लोकअदालमध्ये तडजोड करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालय व नाशिक जिल्ह्यातील तालुका न्यायालयात व नाशिक जिल्ह्यातील तालुका न्यायालयात एकूण ४९ पॅनेलची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व पॅनेल प्रमुख, सदस्य व न्यायालयीन कर्मचारी यांनी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. रोकडे यांच्या मार्गदर्शखाली कामकाज केले. दावा दाखपूर्व प्रकरणांमध्ये एकूण ३९ हजार ५९८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २ हजार २१४ प्रकरणे निकाली निघाली असून रक्कम रूपये ३ कोटी १५ लाख ६४ हजार ४७८ इतकी वसुली झाली. अशा प्रकारे न्यायालयातील प्रलंबित व दावादाखल पूर्व प्रकरणे मिळून एकूण ३ हजार ७६२ प्रकरणांचा निपटारा होवून एकूण रूपये ६४ कोटी ९ लाख ४१ हजार ८४७ इतके शुल्क झाली. या रकमे तडजोड रक्कम समाविष्ट आहे.

'मोटार वाहन चालकांना दिलासा

नाशिकरोड येथील मोटार वाहन न्यायालयात एकूण २ हजार ४८७ मोटार वाहन प्रकरणामध्ये ३५४ प्रकरणे निकाली निघाली असून सदर वाहनचालकांना न्यायालीयीन प्रकरणांपासून दिलासा मिळाला आहे.

'निकाली निघालेली प्रकरणे दृष्टीक्षेपात

'परक्राम्य संलेख अधिनियम,कलम १३८ अंतर्गतची प्रकरणे - ४७३ प्रकरणे

'मोटार अपघात प्रकरणे- १५६ प्रकरणे

'कामगार विषयक- १ प्रकरण

'कौटुंबिक वादातील प्रकरणे- ३२ प्रकरणे

'फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे- २०० प्रकरणे

'इतर - २९०० प्रकरणे

## श्रीपुरवडे येथे पत्नीचा खून करून पतीने केली आत्महत्या

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा (प्रतिनिधी):- बागलाण तालुक्यातील श्रीपुरवडे येथे पत्नीचा खून करून पतीने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून, या दुहेरी मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीपुरवडे जायखेडा रस्त्यालगत शेतात वास्तव्यास असलेले मुरलीधर राघो ठाकरे (६५) आणि त्यांची पत्नी यशोदाबाई मुरलीधर ठाकरे (५८) हे दोघे घरी एकटेच होते. त्यांचा मुलगा व सून हे नातेवाइकांच्या लग्नसमारंभासाठी बाहेरगावी गेले होते.

दरम्यान, पती-पत्नीमध्ये झालेल्या कौटुंबिक वादातून मुरलीधर ठाकरे यांनी संतापाच्या भरात कोयत्याने पत्नी यशोदाबाई यांच्यावर वार केल्याचे सांगितले जाते. यात त्यांचा जागीच मृत्यू





झाला. त्यानंतर मुरलीधर ठाकरे यांनी विषारी औषध प्राशन करून गळफास घेत आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

हि घटना रात्री आठ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. लग्नसमारंभ आटोपून मुलगा व सून घरी परतले असता घरात अंधार असल्याने त्यांनी घरातील लाईट सुरू केले. त्यावेळी घरात यशोदाबाई या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दिसल्या. हा प्रकार पाहून त्यांनी आरडाओरड केल्याने आजूबाजूचे नागरिक घटनास्थळी धावले. नागरिकांनी तातडीने '११२' क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस कर्मचारी पृथ्वीराज बारगळ यांनी घटनास्थळी धाव घेत प्राथमिक पाहणी केली. त्यांनी घडलेली परिस्थिती सहायक पोलिस निरीक्षक सागर काळे यांना कळविल्यानंतर पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. दोघे मृत व्यक्तींना नामपूर येथील ग्रामीण रूग्णालयात श्वविच्छेदन पाठविण्यात आले. पुढील तपास जायखेडा सहाय्यक पोलिस निरीक्षक सागर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहे.




दररोज वाचा दैनिक आवाज

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे मोफत सर्वरोग निदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




**दै. आवाज वृत्तसेवा...**

जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सतीश शिंपी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ संदीप सूर्यवंशी व डॉ बाळू पाटील यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे सर्वरोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय निफाड व SMBT हॉस्पिटल धामणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.


सदरील शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या शिबिराचे उद्घाटन उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील सहनियंत्रण व सल्लागार समिती सदस्य मधुकर शेलार, सागर कुंदे पाटील, दिलीप आबा कापसे व सौ. सुवर्णा लुक्कड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांनी केले. त्यानंतर SMBT हॉस्पिटल येथील डॉ. यश पाटील (बालरोग तज्ञ), डॉ. अजिंक्य पिंगळे (कान-नाक-घसा तज्ञ), डॉ. साईनाथ शिरोडकर (जनरल सर्जन) व डॉ. मयुर सूर्यवंशी यांचे स्वागत करण्यात आले.

शिबिराबाबत प्रस्तावना करताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. तसेच डॉ. यश पाटील यांनी SMBT हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवा व सुविधांबाबत उपस्थितांना माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात मधुकर शेलार यांनी SMBT हॉस्पिटलच्या माध्यमातून गोर-गरीब रुग्णांना मोठा लाभ होत असल्याचे सांगितले. तसेच उपस्थित सर्व रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुपदेशक नितीन परदेशी यांनी केले तर कनिष्ठ लिपीक दिगंबर चेरापले यांनी आभार प्रदर्शन केले. सदरील सर्वरोग निदान शिबिरामध्ये एकूण २५७ रुग्णांनी विविध उपचार सेवा व आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

# 'राजा शिवाजी'ने दोन आठवड्यांत ८४.७० कोटींचा टप्पा ओलांडत आपली स्थिर घोडदौड कायम ठेवली; आता तिसऱ्या आठवड्यात दमदार कामगिरीसाठी सज्ज




**दै. आवाज वृत्तसेवा...**

जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित रितेश देशमुख दिग्दर्शित राजा शिवाजी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपली पकड कायम ठेवली असून, दुसऱ्या आठवड्याचा शेवट ८४.७० कोटींच्या निव्वळ भारतीय एकूण कमाईसह केला आहे.

विक्रमी ओपनिंगसह इतिहास रचल्यानंतर आणि कोणत्याही मराठी चित्रपटासाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा पहिला आठवडा दिल्यानंतर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या महाकाव्याने प्रेक्षकांच्या प्रचंड कौतुकाच्या जोरावर दुसऱ्या आठवड्यातही आपली सातत्यपूर्ण घोडदौड कायम ठेवली आहे.

बॉक्स ऑफिस ब्रेक-अप (भारत):
पहिला आठवडा: ५७.७० कोटी
दुसरा वीकेंड: १७.४० कोटी
११वा दिवस (सोमवार): २.६५ कोटी
१२वा दिवस (मंगळवार): २.७५ कोटी
१३वा दिवस (बुधवार): २.१० कोटी
१४वा दिवस (गुरुवार): २.१० कोटी
एकूण: ८४.७० कोटी निव्वळ

तिसऱ्या आठवड्यातही हीच गती कायम असल्याने, 'राजा शिवाजी' आता बॉक्स ऑफिसवर आणखी एका दमदार वीकेंडच्या तयारीत आहे.

# शासकीय योजनांबाबत प्रबोधन करण्याचे आमदार दिलीप बोरसे यांचे आवाहन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ

सटाणा प्रतिनिधी - प्रशासनातील विविध दाखले व प्रमाणपत्रांविषयी सर्वसामान्य जनतेला सेवा देताना, शासकीय योजनांबाबत प्रबोधन करण्याचे आवाहन आ. दिलीप बोरसे यांनी केले.

महाराष्ट्र शासन महसूल विभागाच्या मार्गदर्शनातून बागलाण तहसील कार्यालय अंतर्गत तालुक्यातील मुंजवाड मंडळाच्या वतीने वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान प्रसंगी बोलताना, आ. बोरसे यांनी प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर करण्यात नागरिकांनी सहभाग घेतल्यास तत्परतेने सेवा प्राप्त होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्रांताधिकारी महेश शेलार, तहसीलदार कैलास चावडे, मंडळ अधिकारी मनोज भामरे, वैशाली जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास सटाणा कृउबा उपसभापती हरिअण्णा जाधव, भाजपा तालुकाध्यक्ष शरद भामरे, भूमी अभिलेख उपाधीक्षक डी एम भावसार, दीपक पिंपळसे, अलका पवार मच्छिंद्र खैरनार, बाळासाहेब देवरे, रणजीत ठाकरे, आबा इंगळे, रोहिदास सावकार परिसरातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, विविध पदाधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळ अधिकारी नितीन विसपुते, संतोष घोडेराव, ग्राम महसूल अधिकारी कल्याणी कोळी, हेमंत बच्छाव, गणेश हरणे, कैलास देसाई, देविदास चौधरी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शशिकांत कापडणीस यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिबिरात बागलाण तहसील कार्यालय पंचायत समिती, तालुका कृषी विभाग तसेच इतर विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

दरम्यान तालुक्यातील सटाणा, जायखेडा, ब्राह्मणगाव आदी ठिकाणी उपरोक्त अभियान संपन्न झाले.

# शेतकरी महिला घेणार स्वामींची परीक्षा - 'देऊळ बंद २' चा टीझर प्रदर्शित




**दै. आवाज वृत्तसेवा...**

श्रद्धा आणि अंधश्रद्धा, देव आणि नास्तिक यांच्यातील युद्धाने आजवर अनेक वळणे घेतली आहेत. मात्र, जेव्हा एक सामान्य स्त्री थेट देवालाच परीक्षेला बसवते, तेव्हा काय होते? याच उत्कंठावर्धक विषयावर आधारित २१ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'वटवृक्ष एंटरटेनमेंट' निर्मित बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित देऊळ बंद २ चा टीझर आज श्री क्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रदर्शित करण्यात आला. अनेक स्वामी भक्तांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्याला निर्माते आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी दाखविण्यात आलेल्या टीझरने उपस्थित भक्तांच्या आणि रसिकांच्या मनात चित्रपटाची उत्सुकता अजूनच वाढली आणि सर्वांनी देऊळ बंद २ आम्ही चित्रपटगृहात जाऊन नक्की बघणार अशी ग्वाही दिली.

देऊळ बंद २ - आता परीक्षा देवाचीच्या टीझरमध्ये आस्तिक शेतकऱ्याची नास्तिक पत्नी असणाऱ्या स्नेहल तरडे उद्विग्न अवस्थेत आपला नवरा देऊळ बंद करून चावी घेऊन कुठेतरी निघून गेला असल्याची तक्रार घेऊन स्वामींना बोलाविण्यासाठी अत्यंत रागाने वारुळावर दगड मारते आणि स्वामी प्रकट होतात कारण भक्ताने मनापासून बोलावले की देव येतोच. त्यानंतर स्वामींचा विविध वाहनातून प्रवास दाखवताना काही दिग्गज कलाकारांची झलक पाहायला मिळते. पुढच्या प्रसंगात स्वामी म्हणतात अगं ए नास्तिके प्रत्येक युगात तुझ्या सारखे कित्येक रावण आणि कित्येक दुर्योधन पाहिलेत मी देवाची परीक्षा पाहणारे त्यावर शेतकरी महिला म्हणते लिहून देते, कधी शेतकरी नसल पाहिला. त्यांच्या या संवादावरून देऊळ बंद २ मध्ये आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक गरीब शेतकरी महिला देवाची सुद्धा परीक्षा घेऊ शकते हे स्पष्ट होत आहे. शेवटच्या प्रसंगात स्नेहल तरडे स्वामींना परत जायला सांगतात पण तू परीक्षेला बसवलं आहे ना? त्यामुळे परीक्षा दिल्या शिवाय मी जाणार नाही... आता परीक्षा देवाची असे म्हणत स्वामी जायला नकार देतात. नदीकाठचा निसर्गरम्य परिसर, भव्य वडाचे झाड आणि एका बाजूला स्वामींची जरब तर दुसऱ्या बाजूला एका सामान्य स्त्रीचे धैर्य, असा हा सामना खिळवून ठेवणारा आहे. आता या परीक्षेत स्वामी कोणत्या प्रश्नांना समोरे जाणार आणि शेतकऱ्यांच्या कोणत्या समस्यांचे निवारण करणार? हे बघण्यासाठी प्रेक्षकांना २१ मे पर्यंत वाट बघावी लागणार आहे.

२१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित देऊळ बंद २ चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. चित्रपटात मोहन जोशी आणि स्नेहल तरडे प्रमुख भूमिकेत दिसणार असून महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, ओम भुतकर, संस्कृती बालगुडे, जगन्नाथ निवंगुणे, सुनील अभ्यंकर, अतुल कुडले आणि प्रविण तरडे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

टीझर पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा
https://youtu.be/z-qojOnl65Y?si=-R3K-cWqmLNwK4Eim

# अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचे मॉडेल उभारावे - मंत्री बावनकुळे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १५: महसूल विभागाने लोकाभिमुख होऊन काम करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने शासकीय पदाचा लोकोपयोगी कामांसाठी उपयोग करुन गतिमान आणि पारदर्शक कामांचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाच्या कामाचा सर्वसमावेशक आढावा घेतला. कौशल्यविकास मंत्री तथा जिल्ह्याचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, महसूल हा नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण केले जाते. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासनाने वेगवेगळ्या भागात पूर्वनियोजन करून स्वतःहून गेले पाहिजे. इज ऑफ डूईंगच्या अत्यावश्यक सेवा तातडीने दिल्या गेल्या पाहिजेत, तसेच त्यांच्याकडे आलेल्या प्रकरणांचा निपटारा देखील तातडीने झाला पाहिजे. स्थानिक समस्या त्याच पातळीवर सोडविल्या गेल्या पाहिजेत असे सांगून शासनापर्यंत येणाऱ्या तक्रारींची संख्या कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रशासनात नाविन्यपूर्ण आणि चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक होईल असे सांगून शासनामार्फत जिल्हा प्रशासनाच्या सर्व समस्या सोडविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

कोणत्याही कारणास्तव शासनाच्या जमिनींवर अटी शर्तींचा भंग होत असल्यास त्यावर कारवाई करुन जमीन शासन जमा करावी, असे निर्देशही मंत्री बावनकुळे यांनी दिले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचे सादरीकरण करुन माहिती दिली. यासह नोंदणी विभाग, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुद्रांक जिल्हाधिकारी आदी विभागांच्या कामांचा मंत्री बावनकुळे यांनी यावेळी आढावा घेतला. प्रलंबित कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# कन्या सासरी गेली अन् पाळीव कुत्र्याने धरला उपवास; नांदूरमध्यमेश्वर येथील भावनिक घटना; ताईच्या विरहात कुत्र्याने सोडले अन्न - पाणी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद:- नांदूरमध्यमेश्वर येथे माणूस आणि प्राणी यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्याचं भावनिक उदाहरण समोर आलं आहे. कु. सिद्धी शिंदे हिच्या विवाहानंतर ती सासरी गेल्यानंतर तिच्या लाडक्या पाळीव कुत्र्याने तब्बल दोन दिवस अन्न-पाण्याला स्पर्श केला नाही. तो सतत तिचीच वाट पाहत होता. सिद्धी माहेरी परतताच कुत्र्याने आनंदाने तिच्या अंगाखांद्यावर उड्या मारत प्रेम व्यक्त केले. विशेष म्हणजे, तिच्या हातून पोळी खाऊनच त्याने अन्न ग्रहण केले. या घटनेची परिसरात भावनिक चर्चाही रंगली असून, माणूस आणि प्राणी यांच्यातील निरागस प्रेम पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

नांदूरमध्यमेश्वर येथील गोपाळराव शिंदे यांची कन्या सिद्धी हिचा विवाह सावरगाव (ता. येवला) येथील शांताराम काकड यांचे चिरंजीव भगवान यांच्यासोबत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लग्नघरातील आनंद, गडबड आणि पाहुण्यांची लगबग सुरू असतानाच घरातील पाळीव कुत्र्याचं वर्तन मात्र अनेकांच्या डोळ्यात पाणी आणणारं ठरलं. सिद्धी हळदीच्या कार्यक्रमासाठी लॉन्सवर गेल्यानंतर त्या कुत्र्याने टाकलेली भाकरी खाल्ली नाही. लग्नाच्या दिवशीही घरच्यांनी त्याच्यासाठी भाकरी व पाणी ठेवून सर्वजण विवाह सोहळ्यासाठी गेले; मात्र दिवसभर त्याने ना अन्नाला स्पर्श केला ना पाण्याचा थेंब प्यायला. सायंकाळी सिद्धी सासरी रवाना झाल्यानंतर कुटुंबीय घरी परतले, तरीही तो शांतपणे तिचीच वाट पाहत बसलेला होता. विशेष म्हणजे, विवाहानंतर तिसऱ्या दिवशी सिद्धी परत माहेरी आली, तेव्हा त्या कुत्र्याचा आनंद अक्षरशः ओसंडून वाहताना दिसला. तिला पाहताच तो तिच्या अंगाखांद्यावर उड्या मारू लागला. तिच्याभोवती फिरत शेपूट हलवत प्रेम व्यक्त करू लागला. अखेर सिद्धीने स्वतःच्या हाताने त्याला पोळी खाऊ घातल्यानंतरच त्याने अन्न ग्रहण केले. 'प्राणी बोलत नाहीत, पण त्यांचं प्रेम नि:शब्द असतं,' याची प्रचिती देणारी ही घटना पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. माणुसकी, माया आणि जिव्हाळा यांचं सुंदर दर्शन



घडवणारा हा प्रसंग परिसरात भावनिक चर्चेचा विषय ठरत आहे.

## मुरघास सयंत्र वाटप योजनेतून पशुपालकांना उद्योजकतेची संधी पात्र पशुपालक व शेतकरी समूहांना लाभ घेण्याचे आवाहन - : पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि. १४ मे २०२६ (जिमाका वृत्तसेवा): आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन चारा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी तसेच पशुपालन क्षेत्रात उद्योजकता विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने पशुसंवर्धन विभागामार्फत मुरघास सयंत्र वाटप योजना पशुपालकांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत मुरघास हार्वेस्टर व बेलर संयंत्र खरेदीसाठी पात्र लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार असून, जास्तीत जास्त पशुपालक व शेतकरी समूहांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे, अशी माहिती पुणे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ( पशुधन व नियोजन) सहआयुक्त देवेंद्र जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना एकाच वेळी चार ओळी हार्वेस्ट करणारे मुरघास हार्वेस्टर तसेच मुरघास बेलर संयंत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. या सयंत्राची किंमत मर्यादा २६ लाख रुपये निश्चित करण्यात आली असून, सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान (कमाल १३ लाख रुपये) तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान (कमाल १९.५० लाख रुपये) देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे किमान १० मोठे पशुधन अथवा १०० शेळ्या / मेंढ्या असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःच्या मालकीचा किमान ५० अश्वशक्ती (क्ष) क्षमतेचा ट्रॅक्टर असणे बंधनकारक आहे. निवड प्रक्रियेमध्ये अत्यल्प भूधारक, अल्प भूधारक, वनहक्क धारक व महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाणार असून, दिव्यांगांसाठी ५ टक्के व महिलांसाठी ३० टक्के आरक्षण लागू आहे.योजनेसाठी अर्ज करताना पशुधन विकास अधिकाऱ्यांचे पशुधन संख्या प्रमाणपत्र, ट्रॅक्टरचे आरसी कार्ड, बँकेचे कर्ज मंजुरी पत्र अथवा स्वनिधीची उपलब्धता दर्शविणारे बँक स्टेटमेंट सादर करणे आवश्यक आहे.

## निफाड उपविभागीय अधिकारी तहसीलदार यांच्या आदेशाने चितेगाव चेहडी खुर्द शिव रस्ता खुला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड - शुक्रवार दिनांक १५ मे २०२६ रोजी मा.उपविभागीय अधिकारी निफाड/मा.तहसीलदार यांच्या आदेशानुसार मौजे चितेगाव ते चेहडी खुर्द शिव या रस्त्याची सर्व संबंधित शेतकऱ्यांना नोटीस देऊन रस्ता खुला करण्याबाबत तारीख देण्यात आली होती. सदरचा दळणवळण रहदारी रस्ता गेली ५० वर्षांपासून वहीवाटीसाठी अस्तित्वात येत नव्हता.

सदरचा रस्ता खुला करणेकामी शासकिय विभागातील मा.श्री.जयंत लिलके महसूल विभागाचे मंडळ अधिकारी चांदोरी विभाग.मा..शेखर पाटील .ग्राममहसुल अधिकारी चितेगाव.कैलास अहीरे ग्राममहसुल अधिकारी चांदोरी. श्रीमती पुर्वा राठोड मॅडम ग्राममहसुल अधिकारी वह्रेदारणा.मा.श्रीमती अबोली साळवे मॅडम ग्राममहसुल अधिकारी मौजे सुकेणे.मा.श्रीमती वाईकर मॅडम ग्रामविकासअधिकारी चितेगाव.मा.श्रीमती गडाख मॅडम ग्रामविकास अधिकारी



मा.श्री.बैरागी भूमी अभिलेख निफाड. माणिक गाडे महसूल सहाय्यक चितेगाव. बोडके महसूल सहाय्यक. राहुल दळवी पोलीस पाटील चितेगाव श्रीमती पुनम मॅडम पोलीस पाटील चेहडी खुर्द. जाधव पोलीस हवालदार सारखेडा पोलीस स्टेशन.तसेच चितेगाव व चेहडी शिवारातील शेतकरी .प्रवीण फडोळ..सिताराम गाडे.भाऊसाहेब दाभाडे.नामदेव ठाणगे. भिमाजी कराटे.साहेबराव कानमहाले. चिमाजी कराटे. निलेश कानमहाले.सागर कराटे.सोमनाथ मंडलिक.दशरथ रुमणे.. शंकर कराटे..बाबाजी आहेर.सुरेश ढिकले. नारायण रुमणे..विजय दरेकर..डि.के. बर्वे चितेगाव सामाजिक कार्यकर्ता. चितेगाव व चेहडी खुर्द शेतकरी यांच्या संयुक्त विचाराने व शासनाच्या माध्यमातून शासकिय अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने चितेगाव चेहडी खुर्द शिवार शिव रस्ता ३ किलोमीटरचा लांबीचा रस्ता अंदाजे दहा ते बारा फूट रुंदीचा वहिवाट रस्ता शेतकऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे. सदरचा रस्ता खुला केल्याने अंदाजे ३००ते ५०० शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. सदर रस्ता खुला केल्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला असुन परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य करुन दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली सर्व शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत

## आंबोली-वेलुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या खर्चास मंजुरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज नाशिक जिल्ह्याशी निगडित विविध विषयांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यात जिल्ह्यातील आंबोली-वेलुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे जिल्ह्यातील शासकीय संस्थांच्या बळकटीकरणास मदत होऊन पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी मदत होणार आहे.

मुंबई येथे मंत्रालयात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

आंबोली-वेलुंजे प्रवाही वळण योजनेस मंजुरी

जिल्ह्यातील आंबोली-वेलुंजे प्रवाही वळण योजनेसाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या योजनेमुळे जलसंपदा व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन परिसरातील सिंचन व पाणी उपलब्धतेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानला वार्षिक अनुदान - नाशिकच्या साहित्य व सांस्कृतिक परंपरेला बळकटी देण्यासाठी कुसुमाग्रज प्रतिष्ठानला दरवर्षी १० लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ग्रंथोत्तेजक संस्था अनुदान योजनेंतर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून हे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे.

नाशिक रिंगरोड प्रकल्पासाठी मुद्रांक शुल्कात सवलत - नाशिक परिक्रमा मार्गासाठी (रिंग रोड) आवश्यक जमिनीच्या खरेदीवर मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जमीन संपादन प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होऊन पायाभूत सुविधा विकासाला गती मिळणार आहे. याशिवाय राज्यात मृद व जलसंधारण विभागाच्या पुनर्रचनेस मंजुरी देण्यात आली असून ८ हजार ७६७ पदांची सुधारित रचना निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नाशिक विभागातील जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास व दुष्काळग्रस्त भागातील कामांना अधिक बळ मिळणार आहे. तसेच सिंचन प्रकल्पांमधील गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरणास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या धोरणाची अंमलबजावणी राज्यातील सहा प्रमुख प्रकल्पांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येणार असून त्याचा लाभ नाशिक जिल्ह्यातील जलसाठा वाढीस व सिंचन व्यवस्थेस होणार आहे.

वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्कावरील सवलत २५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांतर्गत ही सवलत लागू करण्यात येणार असून यामुळे आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक वाढण्यास मदत होणार आहे.



# बजाज समूहाची शंभर वर्षे पूर्ण, स्वातंत्र्य लढ्यापासून जागतिक स्तरापर्यंतचा गौरवशाली प्रवास

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून बजाज समूहाच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे कौतुक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, मे २०२६: भारतातील सर्वात जुन्या कौटुंबिक व्यवसायांपैकी एक आणि १४८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मार्केट कॅपसह सर्वात मोठ्या समूहांपैकी एक असलेल्या बजाज समूहाने आज आपल्या व्यवसायाची १०० वर्षे पूर्ण केली. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी या ऐतिहासिक टप्प्यावर आपल्या शुभेच्छा दिल्या. हा टप्पा भारताच्या स्वतःच्या प्रवासाचा – स्वातंत्र्यलढ्यापासून ते जागतिक आर्थिक महासत्ता होण्यापर्यंतचा आरसा आहे.

१९२६ मध्ये मुंबईत जमनालाल बजाज यांनी स्थापन केलेला हा समूह आज दर तीन भारतीय घरांपैकी एका घरापर्यंत पोहोचला असून त्यात १,३०,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

१०० हून अधिक कंपन्या, १०० हून अधिक देशांमध्ये निर्यात आणि आरोग्यसेवा (हेल्थकेअर) क्षेत्रात होणारे आगामी पदार्पण यासह बजाज समूहाने ऑटोमोबाईल, आर्थिक सेवा आणि इंजिनिअरिंग क्षेत्रात भारतातील सर्वात विश्वासार्ह ब्रँड्सपैकी एक निर्माण केला आहे. यामध्ये बजाज ऑटो, बजाज फिनसर्व्ह, बजाज होल्डिंग्स अँड इन्व्हेस्टमेंट, बजाज फायनान्स, बजाज हाउसिंग फायनान्स, बजाज इलेक्ट्रिकल्स आणि मुकंद यांसारख्या सूचिबद्ध कंपन्यांचा समावेश आहे.

राष्ट्रनिर्मितीमध्ये बजाज समूहाच्या योगदानाची दखल




घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बजाज परिवाराला दिलेल्या संदेशात म्हटले आहे की, बजाज समूहाच्या शताब्दी निमित्त, मी या प्रवासाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाचे अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो. १०० वर्षांचा प्रवास हा कोणत्याही संस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. हे केवळ दीर्घायुष्याचे प्रतीक नसून बदलत्या काळानुसार स्वतःला जुळवून घेण्याच्या, आर्थिक विकासात योगदान देण्याच्या आणि पिढ्यानपिढ्या आपली प्रासंगिकता टिकवून ठेवण्याच्या क्षमतेचे दर्शन घडवते.

श्री जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला बजाज समूह आपल्या देशाच्या विकासाच्या अनेक टप्प्यांवर भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक परिदृश्याचा अविभाज्य भाग राहिला आहे. आज हा समूह एक वैविध्यपूर्ण कंपनी म्हणून विस्तारला असून भारत आणि जगभरातील ग्राहकांना सेवा देत आहे.

गेल्या अनेक दशकांपासून बजाज समूहाने रोजगार निर्मिती, नाविन्यपूर्ण संशोधन आणि




समुदाय विकासाला पाठिंबा देऊन राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा प्रकारचे मैलाचे दगड हे केवळ मागील योगदानाचे स्मरण करण्याचीच नव्हे, तर विकास, शाश्वतता आणि सर्वसमावेशक प्रगतीसाठीची आपली वचनबद्धता पुन्हा दृढ करण्याची संधी असतात.

भारत आज उत्पादन, नवोपक्रम आणि जागतिक स्पर्धात्मकतेमध्ये नवीन आकांक्षांसह पुढे जात आहे. बजाज समूहासारख्या खालवर मुळे आणि प्रदीर्घ अनुभव असलेल्या संस्थांना २०४७ पर्यंतच्या 'विकसित भारत' प्रवासाला आकार देण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे. या अविस्मरणीय प्रसंगी पुन्हा एकदा शुभेच्छा. मला खात्री आहे की आगामी वर्षे निरंतर प्रगतीची आणि देशाच्या विकासात अर्थपूर्ण योगदानाची असतील.

बजाज समूहाच्या सामाजिक प्रभावाच्या प्रयत्नांनी – ज्यात युवक कौशल्य, रोजगार, बाल आरोग्य, शिक्षण आणि संरक्षण यावर लक्ष केंद्रित केले आहे तसेच१ कोटीहून अधिक लाभार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत.

मुंबईतील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया येथे आयोजित शताब्दी सोहळ्याला कुटुंबातील सदस्य, उद्योजक, केंद्रीय आणि राज्य मंत्री, राजकीय नेते आणि नामांकित व्यक्ती उपस्थित होत्या. या संध्याकाळी बजाज परिवाराचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग, व्यापाराकडून उत्पादनाकडे आणि आर्थिक सेवांकडे झालेला प्रवास, आणि आजच्या आधुनिक तंत्रज्ञानापर्यंतचा प्रवास उलगडून दाखवण्यात आला.

या कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे म्हणजे बजाज परिवाराचे संबोधन, ग्रॅमी पुरस्कार विजेते रिकी केज आणि त्यांच्या चमूचा विशेष सादरीकरण, राजकुमार हिराणी दिग्दर्शित जमनालाल बजाज आणि महात्मा गांधी यांच्यावरील 'कथनी करणी एकसी' या लघुपटाचे स्क्रीनिंग आणि '१०० इयर्स ऑफ बजाज' या लोगोचे अनावरण होते.

याप्रसंगी मान्यवरांनी आपले विचार व्यक्तकेले. यावेळी बजाज ऑटोचे अध्यक्ष नीरज बजाज म्हणालेकी, आमच्या कुटुंबाच्या वतीने आम्ही माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींचे त्यांच्या शुभेच्छांबद्दल आभार मानतो. बजाज आणि भारताची कहाणी कधीच वेगळी राहिलेली नाही. भारताचा स्वावलंबनाचा प्रवास अलीकडे सुरू झालेला नाही; तो शंभर वर्षांपूर्वीच सुरू झाला होता – जेव्हा दूरदृष्टी असलेल्या भारतीयांनी असा विश्वास धरला की भारताने स्वतःसाठी निर्माण केले पाहिजे आणि स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. आमचे संस्थापक जमनालालजी हे त्यापैकीच एक अग्रदूत होते. 'वैयक्तिक फायद्यापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य' या त्यांच्या तत्त्वज्ञानाने आमच्या अनेक पिढ्यांचे निर्णय घडवले आहेत.

बजाज ऑटोचे व्यवस्थापकीय संचालकराजीव बजाजयांनी'जागतिकीकरण' या विषयावरआपलेमतव्यक्तकेले. तेम्हणालेकी, आम्ही जे बोलतो आणि जे करतो ते नेहमी सारखेच असले पाहिजे. कदाचित म्हणूनच बजाजचा प्रवास ही केवळ विकासाची कथा न ठरता विश्वासाची कथा बनली. आज बजाज ऑटो ही केवळ भारताचीच नव्हे, तर जगातील पहिल्या तीन दुचाकी कंपन्यांपैकी एक आहे. आमची वाहने आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आग्नेय आशियातील १०० हून अधिक देशांत विकली जातात. आजचा भारत केवळ जागतिक अर्थव्यवस्थेत सहभागी होत नाही, तर तो स्पर्धाही करत आहे.

बजाज इंटिग्रेटेड हेल्थ सिस्टीमचे सीईओ नीरव बजाजयांनी 'सर्वसमावेशक विकास' या विषयावरआपलेमतव्यक्तकेले. तेम्हणालेकी, जमनालालजींचा असा विश्वास होता की व्यवसाय हा समाजापेक्षा वेगळा नसतो. व्यवसायाचा उद्देश गरिबांचा फायदा करणे हा असावा. 'बजाज बियॉन्ड' हा उपक्रम आमच्या १०० वर्षांच्या याच तत्त्वज्ञानाची पुढची अभिव्यक्ती आहे. येत्या ५ वर्षात २ कोटी तरुण भारतीयांवर प्रभाव टाकण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज यांनी'भारत आणि पुढील १०० वर्षे' या विषयावर आपले मांडले. ते म्हणाले की,

माझे वडील राहुल बजाज नेहमी म्हणायचे – माझा 'आयडिया ऑफ इंडिया'वर आणि येथील तरुण पिढीवर ठाम विश्वास आहे. भारताच्या प्रगतीचा पुढचा अध्याय तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनाद्वारे लिहिला जाईल. बजाजमध्ये आम्ही AI कडे केवळ एक तंत्रज्ञान म्हणून पाहत नाही, तर ती आर्थिक समावेशनासाठी एक शक्तिशाली शक्ती असल्याचे मानतो.

बजाज इलेक्ट्रिकल्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर बजाज म्हणालेकी,

जमनालालजींचे कार्य सामाजिक समता, महिला आणि मुलांचे शिक्षण, ग्रामीण उत्थान आणि खादीच्या प्रसारापर्यंत विस्तारलेले होते. यश हे केवळ आकड्यांत मोजावे की आपण किती लोकांच्या जीवनाला स्पर्श केला आणि कोणती मूल्ये जपली यावर? पुढील १०० वर्षांत या प्रश्नाचे उत्तरच आमची संस्था परिभाषित करेल.

# अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्याच्या कामकाजाचा न्या. संदीप शिंदे (निवृत्त) यांनी घेतला आढावा

**जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाबाबत व्यक्त केले समाधान**

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी- मराठा जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहीत करण्यासाठी गठित न्या. संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपजिल्हाधिकारी कुंदन हिरे (प्रशासन), उपविभागीय अधिकारी अप्पासाहेब शिंदे (दिंडोरी), कैलास कडलग (चांदवड), जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव राकेश पाटील आदी उपस्थित होते, तर अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह उपविभागीय अधिकारी हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

न्या. शिंदे (निवृत्त) यांनी सांगितले की, पात्र लाभार्थ्यांना वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधत जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याच्या प्रक्रियेची गती वाढवावी. त्यासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून घ्यावी, असे सांगत न्या. शिंदे (निवृत्त) यांनी प्राप्त अर्जांची सद्य:स्थिती व निकाली काढलेले अर्ज, प्रलंबित अर्जांची कारणे व त्यावरील उपाययोजना, प्रमाणित मोडी लिपिचे भाषांतरकार यांचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यात १ कोटी दहा लाखांहून अधिक नोंदी तपासण्यात आल्या आहेत. ऑक्टोबर २०२३ पासून आतापर्यंत १ लाख १८ हजार ५८५ अर्जांपैकी १ लाख १६ हजार ५५८ नवीन जात प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. तसेच ६ मे २०२६ पर्यंत ३० हजार ७९९ जात वैधता प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आल्याचे सांगितले. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. याबद्दल न्या. शिंदे (निवृत्त) यांनी समाधान व्यक्त केले.




दररोज वाचा, दैनिक आवाज

